# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 10 May 2025

Time 17.20 to 17.30

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १० मे २०२५ सायंकाळी ५.२०**

****

- पाकिस्तानी कारवायांना भारताचं चोख प्रत्युत्तर-अनेक लष्करी केंद्रं आणि शस्त्रसाठे उध्वस्त
- आपत्तकालीन परिस्थितीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासन सज्ज-नागरिकांना सहकार्याचं आवाहन
- महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशादरम्यान तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाबाबत सामंजस्य करार

आणि

- ज्येष्ठ रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं मुंबईत दीर्घ आजारानं निधन

****

पाकिस्तान सातत्यानं करत असलेली घुसखोरी आणि ड्रोन हल्ल्यांना भारतानं चोख प्रत्युत्तर दिलं आहे. भारतीय हवाई दलाच्या विमानांनी हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या शस्त्रांचा वापर करत पाकिस्तानच्या रफिक्की, मुरीद, चकलाला, रहिमयार खान, सियालकोट आदी ठिकाणची लष्करी केंद्रं, नियंत्रण केंद्रं, रडार आणि शस्त्रसाठ्यांवर हल्ले करत ती उद्ध्वस्त केली. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी, कर्नल सोफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी आज नवी दिल्लीत विशेष पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली. या कारवाईबाबत माहिती देतांना कर्नल कुरेशी म्हणाल्या –

**बाईट – कर्नल सोफिया कुरेशी**

भारतीय हवाई दलाचं सिरसा इथलं केंद्र उद्धवस्त केल्याचा पाकिस्ताननं केलेला दावा पूर्णपणे चुकीचा असून हे केंद्र पूर्ण क्षमतेनं सुरू असून, तिथली आजची छायाचित्रं यावेळी दाखवण्यात आली. भारतातले सुरतगड आणि सिरसा इथले हवाई दलाचे तळ तसंच एस-४०० ही हवाई सुरक्षा प्रणाली नष्ट केल्याचा पाकिस्तानचा दावा सपशेल खोटा असल्याचंही विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी सांगितलं.

पाकिस्तान सीमाभागात मोठ्या प्रमाणात सैन्याची जमवाजमव करत असून, सीमावर्ती भागात सातत्यानं गोळीबार केला जात आहे. पाकिस्तानकडून होत असलेल्या या कारवाईला जबाबदारीने चोख प्रत्युत्तर दिलं जात असल्याची माहिती परराष्ट्र सचिव मिस्री यांनी दिली –

**बाईट – विक्रम मिसरी, परराष्ट्र सचिव**

भारतीय सैन्यानं जम्मूजवळील पाकिस्तानी चौक्या आणि ट्यूब ड्रोन लाँच पॅड उद्ध्वस्त केले.

दरम्यान पाकिस्तानकडून सातत्याने अफवा आणि चुकीची माहिती पसरवली जात आहे. समाजमाध्यमांवर बनावट प्रतिमा, चित्रफिती प्रसृत करत पाकिस्तान सर्वसामान्यांची दिशाभूल करत आहे. अशा प्रकारचा कोणताही मजकूर आढळल्यास तात्काळ पत्र सूचना कार्यालयाला याची माहिती द्यावी, ८७ ९९ ७१ १२ ५९ या व्हॉट्सअप क्रमाकांवर किंवा socialmedia@pib.gov.in या मेलवर असा मजकूर पाठवावा, असं आवाहन या कार्यालयानं केलं आहे.

****

आपत्तकालीन परिस्थितीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासन सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली आहे. जिल्ह्यात आज पैठण इथं मॉक ड्रील घेण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर शहरासह वेरुळ अजिंठा भागात उद्या रविवारी मॉक ड्रिल घेण्यात येणार असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. ते म्हणाले –

**बाईट – दिलीप स्वामी, जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

दरम्यान, सीमेवर वाढता तणाव पाहता, आपल्या शहरात होणाऱ्या सैन्यदलाच्या वाहनांच्या किंवा सैनिकांच्या कोणत्याही हालचालींचं चित्रीकरण करू नये, असे

निर्देश पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी दिले आहेत. देशाच्या सुरक्षेशी निगडित या प्रकरणी नागरिकांकडून सहकार्याचं आवाहन पोलिस आयुक्तांनी केलं आहे. नागरिकांनी ब्लॅक आऊटच्या काळात काय काळजी घ्यावी, याबाबतही पोलिस आयुक्त पवार यांनी मार्गदर्शन केलं, ते म्हणाले..

**बाईट – प्रवीण पवार, पोलिस आयुक्त**

****

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज बीड जिल्हा रुग्णालयाची पाहणी केली. जॉन्सन यांनी कर्मचाऱ्यांची तसंच रुग्णांची चौकशी करत आरोग्य विभागाची माहिती घेतली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर संजय राऊत यांच्यासह विविध विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

****

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशादरम्यान तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाचा सामंजस्य करार आज करण्यात आला. आज भोपाळ इथं झालेल्या आंतरराज्य नियंत्रण मंडळाच्या २८ व्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला १९ पूर्णांक ३६ शतांश टीएमसी पाणी मिळणार असून मध्यप्रदेशला ११ पूर्णांक ७६ शतांश टीएमसी पाणी मिळणार आहे. तापी नदीच्या तीन प्रमुख प्रवाहातून कालवे काढून संबंधित क्षेत्राच्या कानाकोपऱ्यात हे पाणी पोहोचवलं जाईल. ही योजना जगातली सर्वात मोठी जल पुनर्भरण योजना असून, या प्रकल्पामुळे कोणत्याही गावाचं विस्थापन होणार नाही, असं मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सांगितलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेच्या लाभाबाबत अधिक माहिती दिली, ते म्हणाले –

**बाईट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

ज्येष्ठ रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं आज मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते ६१ वर्षांचे होते. पानिपत, बेल बॉटम, उरी, दंगल, पीके यासारख्या गाजलेल्या हिंदी चित्रपटांसाठी, तर पावनखिंड, फत्ते शिकस्त, शेर शिवराज यासारख्या ऐतिहासिक चित्रपटांसाठी त्यांनी रंगभूषाकार म्हणून काम केलं. विक्रम गायकवाड यांना सात वेळा राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.

****

आकाशवाणी नागपूरचे माजी केंद्र संचालक गुणवंत थोरात यांचं आज सकाळी नागपूर इथं एका खाजगी इस्पितळात निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. आपल्या कार्यकाळात त्यांनी नागपूर, यवतमाळ, सोलापूर इथं काम केलं होतं. त्यांच्या पार्थिव देहावर उद्या अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण बदली प्रक्रियेअंतर्गत आज ग्रामीण पाणीपुरवठा, बांधकाम आणि ग्रामपंचायत विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या पार पडल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बदली प्रक्रिया पार पडली.

****

हवामान

राज्यात आज सर्वाधिक ४० पूर्णांक सहा दशांश सेल्सिअस तापमान नागपूर इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ३५ पूर्णांक सहा, धाराशिव ३७ पूर्णांक चार, बीड ३७ पूर्णांक पाच तर परभणी इथं ३८ पूर्णांक पाच दशांश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****